# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २४०/८८ मधील निशाणी क्र. १२४ वर आदेश

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम १ व २, आदेश १ नियम ८(१)(बी) सह कलम १५१ खालील तरतुदीनुसार दाखल केला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरणातील नि.क्र. ४७ वरील आदेशानुसार नि.क्र. १ मध्ये दुरूस्ती करण्याचे अनावधानाने वादीकडून राहून गेलेले आहे. त्यामुळे त्याबाबत दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्याची व सदर दावा प्रतिनिधीक व वैयक्तिक स्वरूपात चालविण्यास परवानगी मिळण्याची वादीने विनंती केली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादीतर्फे म्हणणे दाखल करण्यात आले असून प्रतिवादीने तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरणातील वादीने नि.क्र. ९२ ला दाखल केलेला अर्ज व नि.क्र. १२१ ला दाखल केलेला पुनर्विलोकनाचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर अर्जाला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ ची बाधा येते. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादीने शेवटी विनंती केली आहे.

३. सदर प्रकरणामधील वादीचा व प्रतिवादीतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदर प्रकरणातील वादीतर्फे खाली नमूद न्यायनिवाडे दाखल केलेले आहेत.

१. फर्नांडिस व इतर वि. रॉड्रीक्स व इतर २१ (बॉम्बे) ७८४.

२. चेनु मेनन व इतर वि. कृष्णन व इतर २५ एम. ३९९.

---

३. रमेश श्रीराम सुळे वि. दिलीपराज निरंजनकुमार गोयंका व इतर २००९(१) एम.एच.एल.जे. ४२९.

सदर न्यायनिवाडयांचे व सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रकरणातील वादीने नि.क्र. ९२ ला सदर अर्जात नमूद तरतुदी नमूद करून अर्ज दाखल केला होता. सदर नि.क्र. ९२ वरील अर्जातील कथन व प्रस्तुत अर्जातील कथन विचारात घेतले असता सदर दोन्ही अर्जातील कथन जवळपास एकसारखेच असल्याचे स्पष्ट होते. तसेच नि.क्र. ९२ वरील अर्जातील मागणी व प्रस्तुत अर्जातील मागणी एकच आहे. सदर नि.क्र. ९२ वरील अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. सदर नि.क्र. ९२ वरील आदेशाच्या पुनर्विलोकनाकरीता वादीने नि.क्र. १२१ ला अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज देखील नामंजूर करण्यात आलेला आहे. वर नमूद न्यायनिवाडयांचे अवलोकनावरून याठिकाणी नम्रपुर्वक नमूद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुत प्रकरणातील हकीकत व वर नमूद न्यायनिवाडयामधील हकीकत भिन्न आहेत. त्यामुळे सदर न्यायनिवाडे प्रस्तुत प्रकरणाला लागू होत नाहीत असे मला वाटते.

५. सदर अर्जातील कथन विचारात घेऊन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर अर्जातील मागणीबाबत नि.क्र. ९२ व नि.क्र. १२१ वरील आदेशामध्ये निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणातील

वादीची प्रस्तुत अर्जातील मागणी यापुर्वीच नामंजूर करण्यात आलेली असल्याने याठिकाणी मा. उच्च न्यायालयाने *सिरा कन्स्ट्रक्शनस् वि. सुधीर विष्णु आंजर्लेकर २०११(४) एम.एच.एल.जे. ६५४* मध्ये नोंदविलेला न्यायनिवाडा नमूद करणे आवश्यक वाटतो. सदर न्यायनिवाडयामध्ये मा.उच्च न्यायालयाने अंतरीम अर्जाला देखील रेसज्युडीकेटा व कन्स्ट्रक्टीव्ह रेस ज्युडीकेटा (constructive Res-judicata) या न्यायतत्वाची बाधा येत असल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे. त्यामुळे सदर न्यायनिवाडा व प्रस्तुत प्रकरणातील हकीकत विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्जातील मागणीला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११ खालील तरतुदीची बाधा येते. तसेच अर्जातील मागणीबाबत वादीचा याआधीचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. नि.क्र. ९२ वरील अर्ज दाखल करतेवेळीच्या परिस्थितीमध्ये व प्रस्तुत अर्ज दाखल करतेवेळीच्या परिस्थितीमध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कोणतेही नवीन कारण घडल्याचे स्पष्ट होत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. नि.क्र. १२४ वरील अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—

दि. १७/०२/२०१५.　　　　(शि. म. गौरगोंड)

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.